मोटार वाहन विभागातील सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी संवर्गातील अधिका-यांना देण्यात आलेला मानीव दिनांक व त्याअनुषंगाने दिलेली पदोन्नती याबाबींची चौकशी करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या समितीस मुदतवाढ देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः लवेसू-१११८/प्र.क्र.२४१/(भाग१)/परि-४

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२
२ रा मजला, मंत्रालय (मुख्य इमारत)
दिनांक : ३० ऑगस्ट २०१९

वाचा -

१) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे पत्र क्र.३०४१८/म.वि.स./ई-२, दि. २७.११.२०१८.
२) महाराष्ट्र विधानपरिषद सभागृहात झालेल्या चर्चेचे दि. २९.११.२०१८ चे कार्यवृत्त.
३) शासन निर्णय समक्रमांक, दि. १४.१२.२०१८, दि. ०६.०२.२०१९ व दि. ०९.०५.२०१९

प्रस्तावना -

महाराष्ट्र विधानमंडळाचे हिवाळी अधिवेशन २०१८ मध्ये मा. श्री. कपिल पाटील, वि.प.स. यांनी मोटार वाहन विभागातील सहाय्यक प्रादेशिक अधिकारी संवर्गातील अधिका-यांची ज्येष्ठतासूची, मानीव दिनांक व देण्यात येणा-या पदोन्नत्या याबाबत उपस्थित लक्षवेधी सूचना क्र. ७०१ वरील चर्चेच्यावेळी दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने चौकशी करण्यासाठी अतिरिक्त मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग यांच्या अध्यक्षतेखाली संदर्भ क्र. ३ वरील दि. १४.१२.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती गठीत केली होती. सदरहू समितीला अहवाल सादर करण्यास संदर्भ क्र. ३ वरील दि.०९.०५.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये तीन महिन्यांची देण्यात आलेली मुदतवाढ दि. १३.०७.२०१९ संपुष्टात आली आहे. सदर मुदत संपुष्टात आल्याने प्रस्तुत समितीस अहवाल सादर करण्यास मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय-

हिवाळी अधिवेशन २०१८ मधील लक्षवेधी सूचना क्र. ७०१ वरील दिलेल्या आश्वासनानुसार मोटार वाहन विभागातील सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी संवर्गातील अधिका-यांना देण्यात आलेला मानीव दिनांक व त्याअनुषंगाने दिलेली पदोन्नती याबाबींची चौकशी करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीस चौकशी करावयाच्या विषयाची व्याप्ती विचारात घेता, त्यांचा अहवाल शासनास सादर करण्यास दि. १४.०७.२०१९ पासून सहा महिन्याची मुदतवाढ देण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८३०१५२५१७८४२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

KADAM
DATTATRAY
HANMANT

Digitally signed by KADAM DATTATRAY HANMANT
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=cf316337e92d3c54da432222208093bfc6ed1d1570f09
4663515273d0b4d27fc, postalCode=400032, street=HOME
DEP.MANTRALAYA,MUMBAI,
serialNumber=a923979cf886d5724fbed87cd57745c3f72eba57
b0d277f11e970f0aaca99802, ou=NA, o=GOVERNMENT OF
MAHARASHTRA, cn=KADAM DATTATRAY HANMANT
Date: 2019.08.30 15:37:09 +05'30'

(द. ह. कदम)
अवर सचिव, गृह (परिवहन) विभाग

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव.
२. अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
३. प्रधान सचिव, परिवहन विभाग, मंत्रालय, मुंबई
४. परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५. परिवहन उप आयुक्त (प्रशासन), परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई
६. निवडनस्ती (परिवहन-४).